# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०३/०४/२०१७

## *येलचिल येथे नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना*

अहेरी एटापल्ली मार्गावर येणाऱ्या मौजा येलचिल येथे काल दिनांक ०२/०४/२०१७ रोजी नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली. अहेरी उपमुख्यालयापासून २२ किमी अंतरावर असणाऱ्या अतिदुर्गम व नक्षलग्रस्त अशा येलचिल येथे जनतेचे संरक्षणासाठी तसेच नक्षली कारवायांना आळा घालण्याकरीता पोमके येलचिलची स्थापना केली आहे.

नक्षलमुक्त गडचिरोलीचे ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने अतिसंवेदशील दुर्गमभागातील असलेला नक्षलभागाचा प्रभाव कमी करण्यासाठी अतिदुर्गम भागात नवीन पोमकेंची स्थापना करण्यात येत आहे. येलचिल गाव व परिसरातील गावे ही अतिसंवेदशील तसेच आदिवासी बहुल असून नक्षलप्रभावीत आहेत. त्यामुळे या परिसरातील नक्षलवादास आळा घालण्यासाठी पोमके येलचिलची स्थापना करण्यात आली. येलचिल गाव व परिसरातील गावकऱ्यांच्या सोबतीने मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते पोमके येलचिलची स्थापना व भुमीपुजन करण्यात आले. पोलीस मदत केंद्र स्थापन कार्यक्रमाचे औचीत्य साधून येलचिल गाव व परिसरातील गावकऱ्यांकरीता जनजागरण मेळावा आयोजीत करण्यात आला होता.

जनतेच्या सर्व अडीअडचणी सोडविण्यासाठी येलचिल पोमकेचे नेहमीच सहकार्य राहील. नक्षलवादांमुळे जो विकास आतापर्यंत खुंटला आहे तो पोलीस विभागाच्या नक्षलविरोधी कारवायांमुळे साधता येणार आहे. त्यामुळे नक्षली कारवायांना न घाबरता पोलीस विभागाच्या मदतीने आपल्या भागाचा विकास साधावा असे प्रतिपादन मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख यांनी जनजागरण मेळाव्यात केले. जनजागरण मेळाव्यादरम्यान उपस्थित गावकऱ्यांना पथनाटयाद्धारे विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित महिलांना साडी व पुरूषांना ड्रेस तसेच तरूणांना खेळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

पोमके येलचिल स्थापनेवेळी मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. मंजुनाथ सिंगे, मा. अपर पोलीस अधिक्षक अभियान डॉ. महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक अहेरी श्री. ए. राजा, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकरी अहेरी श्री. गजानन टोम्पे,उपविभागीय पोलीस अधिकरी एटापल्ली नितीन जाधव, अहेरीचे पोलीस निरीक्षक श्री. संजय मोरे, नायब तहसीलदार चंद्रकांत तेलंग, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी, गावातील प्रतिष्ठीत नागरीक आदी मान्यवर व परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.




लीसमदतकेंन्द्र
येलचील
Rajesh


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
केंद्र,
/०४/२०१७ रोज रविवार
I.P.S.